## <u>रे. दिवाणी मुकदमा नं.८५/२०१८ मधील नि.७१ वरील आदेश</u>
## (<u>जालिंदर केरु सुर्यवंशी वि. राजू बाबूराव सुर्यवंशी वगैरे</u>)
(**CNR**:**MHSN**12000665-2018)

वादी यांनी प्रतिवादी क्र.१३, १६, २३, २०, २२, २४, २५ यांची नावे दाव्यातून कमी करणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे-

वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द डिक्लरेशन व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं. १३ आनंदीबाई पांडुरंग सुर्यवंशी या २९/११/२०१९ रोजी मयत झाल्या आहेत. सदर प्रतिवादीचे वारस प्रतिवादी नं. ५ ते ८ दाव्याचे कामी पूर्वीच दाखल आहेत. तसेच प्रतिवादी नं. १६ खाशीबाई कोंडीबा सुर्यवंशी ह्या दि. २५/१/२०२१ रोजी मयत झाल्या असून सदर प्रतिवादीचे वारस प्रतिवादी नं. १७ ते २५ हे दाव्याचे कामी पूर्वीच दाखल आहेत.

त्याचप्रमाणे प्रतिवादी नं. २३ श्रीमती कमल शामराव पडळकर ह्या दि. २६/१०/२०२० रोजी मयत झाल्या आहेत. सदर प्रतिवादींचे वारस श्री. निलेश शामराव पडळकर व वैशाली शामराव पडळकर यांनी दि. २८/३/२०२२ रोजी हक्क सोडपत्र दस्त अ. नं. १०३०/२०२२ ने या दाव्यातील प्रतिवादी नं. १७, १८, १९, २१ यांना करुन दिलेले आहे. तसेच प्रतिवादी नं. २० कु. शितल दादासो सुर्यवंशी, प्रतिवादी नं. २२ सौ. सुमन सुभाष पाटील, प्रतिवादी नं. २४ सौ. नंदिनी मोहन माने, प्रतिवादी नं. २५ रंजना आनंदराव वडगांवे यांनी दि. २८/३/२०२२ रोजी हक्क सोडपत्र दस्त अ. नं. १०३०/२०२२ ने या दाव्यातील प्रतिवादी १७, १८, १९, २१ यांना करुन दिले आहे.

३. सबब वर नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं. १३, १६, २३, २०, २२, २४, २५ यांची नावे दाव्यातून कमी करणेत येवून त्याप्रमाणे दाव्याचे कामी नि. १ व इतर कागदोपत्री दुरुस्ती होवून मिळणेस वादी यांनी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी नं. १ ते १४ यांनी नि. ७३ ला त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये प्रतिवादींनी कथन केले की, वादीचा प्रस्तुत अर्ज व त्यामध्ये नमुद कथने ही खोटी, लबाडीची असून त्यांना मान्य व कबुल नाहीत. सबब वादीचा अर्ज

नामंजूर करणेत यावा. यदाकदाचित मे. कोर्ट वादीचा अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत आलेस वादीला र. रु. २०००/– इतका दंड करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे. .

५. वादी यांचा विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. कोणत्याही दाव्याचे पुर्णपणे निराकरण होण्यासाठी दाव्यामध्ये वादी, प्रतिवादी व दाव्याचे वर्णन अचुक असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने दाव्यातील दुरुस्ती पाहता वादीतर्फे प्रतिवादी नं. १३, १६ व २३ हे मयत असलेने आणि प्रतिवादी नं. २०, २२, २४, २५ यांनी हक्कसोड पत्र करुन दिलेने त्यांचेविरुध्द वादीची कोणतीही तक्रार राहिलेली दिसून येत नाही. सबब दाव्यामध्ये अशा प्रकारे दुरुस्ती मंजूर केली असता त्यामुळे दाव्याचे निराकरण होण्यास मदतच होणार आहे. सदरची दुरुस्ती केल्यामुळे मुळ दाव्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. त्यामुळे वादीतर्फे कथनाचा विचार करता वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा नि.७१ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत नि.७१ चे अर्जात सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे.

३. वादी यांनी सदरची दावा दुरुस्ती करुन सदरची दावा दुरुस्त प्रत मे. कोर्टासाठी व प्रतिवादींसाठी पुढील तारखेस हजर करावी.

IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN
Digitally signed by IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2022.09.15 13:10:58 +05'30'

**पलूस** **( आय. ए. वाय. ए. खान )**

**दिनांक–१४/०९/२०२२** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. S. V. Kadam<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 14/09/2022 |
| Signed by P. O. on | : | 14/09/2022 |
| Uploaded on | : | 15/09/2022 |